दैनिक
# महाराष्ट्र जीत
● मुख्य संपादक: सागर राणा अंभोरे ● संपादक: प्रशांत पाटील ठाकरे
RNI No- MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ शनिवार, ०३ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष: ३ ■ अंक: १६२ ■ पाने: ४ ■ किंमत: ५ रूपये
Title code: - MAHMUL039353

# भविष्यातील सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणासाठी जनजागृती हीच 'फायरवॉल' – मंत्री ॲड. आशिष शेलार

## देशव्यापी 'बी सायबर स्ट्रीट स्मार्ट' जनजागृती मोहिमेचा शुभारंभ

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** शहरे, लहान गावे आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा ऑनलाइन वावर वाढत असताना त्यांना सायबर गुन्ह्यांच्या नवनवीन प्रकारांचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे डिजिटल जनजागृती आणि डिजिटल स्वच्छता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची असून, भविष्यातील सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती हीच प्रभावी 'फायरवॉल' ठरू शकते, असे माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (डीएससीआय) सायबर सुरक्षा जनजागृती महिना २०२६ अंतर्गत देशव्यापी 'बी सायबर स्ट्रीट स्मार्ट' मोहिमेचा शुभारंभ मंत्री ॲड. शेलार यांच्या हस्ते मुंबईतील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये (बीएसई) झाला. महिनाभर चालणाऱ्या या मोहिमेत नागरिकांना दैनंदिन सायबर सुरक्षेच्या सवयींबाबत मार्गदर्शन करण्यासह कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने होणारी फसवणूक आणि वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूक करण्यात येणार आहे.मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, निवृत्तीवेतनधारक, गुंतवणूकदार, ऑनलाइन शिक्षण घेणारे विद्यार्थी, डिजिटल उपकरणे वापरणाऱ्या माता तसेच ई-स्पोर्ट्स खेळाडू अशा प्रत्येक घटकाने ऑनलाइन सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी समजून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकापर्यंत सोपे आणि व्यवहार्य सुरक्षाविषयक संदेश पोहोचविणारी ही बहुघटक मोहीम कुटुंबे, व्यवसाय आणि समुदायांच्या सायबर सुरक्षेला बळकटी देईल. 'कठपुतळी' ही संकल्पना सायबर संरक्षणाचे महत्त्व प्रभावीपणे मांडते. ही मोहीम देशातील सर्वांत व्यापक सायबर जनजागृती मोहिमांपैकी एक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सायबर क्षेत्रातील सामूहिक प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी राज्य शासन उद्योग क्षेत्रासोबत काम करण्यास कटिबद्ध आहे. सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक बाब नसून नागरिकांचा सजग सहभागही तितकाच आवश्यक आहे, असे मंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

बदलत्या सायबर धोक्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक – प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

सायबर सुरक्षेबाबत माहिती देताना माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले



की, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून नागरिकांना लक्ष्य करणारे सायबर धोके वेगाने बदलत आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी केवळ तांत्रिक संरक्षण पुरेसे नसून प्रत्येक व्यक्तीने सतर्क राहणे आवश्यक आहे. 'बी सायबर स्ट्रीट स्मार्ट'सारख्या मोहिमांमधून डिजिटल धोक्यांचे स्वरूप सोप्या पद्धतीने समजावून सांगितले जात असून नागरिकांना व्यवहार्य सुरक्षाविषयक सवयी अंगीकारण्यासाठी सक्षम केले जात आहे.

सुरक्षित डिजिटल परिसंस्थेसाठी सर्व संबंधित घटकांमध्ये भक्कम समन्वय आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने माहितीपूर्ण, सावध आणि सायबरदृष्ट्या सजग राहिल्यास अधिक सुरक्षित व सक्षम डिजिटल भारताच्या उभारणीत योगदान देता येईल, असे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

ऑक्टोबर हा महिना जगभरात सायबर सुरक्षा जनजागृती महिना म्हणून पाळला जातो. मोहिमेच्या शुभारंभानिमित्त बीएसईच्या पारंपरिक घंटानादाच्या धर्तीवर 'रिंग द बेल फॉर सिक्युरिटी' हा प्रतीकात्मक उपक्रम राबविण्यात आला. सुरक्षित सायबर अवकाशासाठी शासन आणि उद्योग क्षेत्राची सामूहिक बांधिलकी यातून व्यक्त करण्यात आली. यावेळी मोहिमेच्या 'सायबर अँथम'चेही अनावरण करण्यात आले.

या मोहिमेला इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT-In), केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत इंडियन सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेंटर (I4C), केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, महाराष्ट्र शासन तसेच बीएसईसह विविध उद्योग भागीदारांचे सहकार्य लाभले आहे.

भारतीय पारंपरिक कठपुतळी कथाकथन कलेचा डिजिटल युगासाठी वापर करून सायबर सुरक्षेचे संदेश सहज समजतील, लक्षात राहतील आणि नागरिकांना इतरांपर्यंत पोहोचविता येतील, अशी मोहिमेची रचना आहे.

या माध्यमातून मोबाइल ॲप, ई-मेल, समाजमाध्यमे आणि डिजिटल व्यवहारांमधील सुरक्षित सवयींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# तरुणांनो आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करा – प्राचार्य डॉ. सुनील चकवे

## 18 पूर्ण होणाऱ्या मुला–मुलींचे मतदार नोंदणी अभियान

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत: प्रशांत ठाणे :** दारव्हा स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे सांस्कृतिक विभागाचे वतीने जे विद्यार्थी 18 वर्ष पूर्ण झालेले आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांनी आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा महाविद्यालया एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती गाडगेबाबा व मुंगसाजी महाराज यांचे प्रतिमा पुजन करुन करण्यात आली. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे सर यांनी स्विकारले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाणिज्य शाखा विभाग प्रमुख डॉ. खुशाल ढवळे, कला शाखाप्रमुख डॉ. संतोष चतुर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप भुरले हे होते. ज्यांचे आज दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी विद्यार्थ्यांनचे वय वर्ष 18 पूर्ण झाले. त्या विद्यार्थ्यांना फार्म नमुना 6 "भारत निवडणूक आयोग", "नविन मतदानासाठी अर्जाचा नमुना" भरुन देवून आपले नाव मतदारयादीत समाविष्ट करून या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य करावे




असा संदेश देऊन कार्यशाळा यशस्वी करण्यात आली. सदर कार्यक्रम मा. श्री. गजानन गुल्हाने साहेब नायब तहसीलदार, दारव्हा (निवडणूक) यांचे प्रमुख मार्गदर्शनात घेण्यात आला. यांनी मार्गदर्शन केले. मा. प्राचार्य डॉ. सुनील चकवे सर यांनी देशातील राजकीय पार्श्वभूमीवर व्यवस्था यात मतदारांची भूमिकेवर प्रकाश टाकला. आपण 18 वर्ष पूर्ण करुन देशाचे एक सुजाण नागरिक आहात असे समजावून सांगत समाचार घेतला. सदर सभेचे सुत्रसंचालन प्रा. गुनरत्न कांबळे यांनी केले तर आभार कु. गावंडे मॅडम यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. मनिष मोहरील, प्रा. विकास पाईकराव, प्रा. सिध्दार्थ वानखडे तथा रासेयो व सांस्कृतिक विभाग विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.

# मुसळधार वारा–पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा; आमदार दौलत दरोडा यांचे तहसीलदारांना पत्र

## वाडा तालुक्यातील शेती, घरे, पोल्ट्रीफार्म व शासकीय कार्यालयांच्या नुकसानीची पाहणी करून मदत देण्याची मागणी

महाराष्ट्र जीत

**पालघर- श्री तुषार भोईर** वाडा: वाडा तालुक्यात ३० सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या मुसळधार वारा-पावसामुळे विविध भागांत शेती, घरे, पोल्ट्रीफार्म तसेच शासकीय कार्यालयांचे नुकसान झाल्याचे नमूद करत, या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधितांना शासकीय मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शहापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार दौलत दरोडा यांनी वाड्याचे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

याबाबत आमदार दरोडा यांनी तहसीलदार कार्यालयाला लेखी पत्र दिले आहे. पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, त्यांच्या शहापूर विधानसभा मतदारसंघातील वाडा तालुक्यात ३० सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या मुसळधार वारा-पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे तालुक्यातील विविध ग्रामपंचायत हद्दीतील गाव-पाड्यांमध्ये शेतीचे तसेच घरांचे नुकसान झाले असून, पोल्ट्रीफार्म






व्यवसायालाही फटका बसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय काही शासकीय कार्यालयांचेही नुकसान झाल्याचे आमदारांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

नुकसानग्रस्त नागरिकांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असल्याने तहसील कार्यालयामार्फत विशेष पाहणी पथक तयार करून संबंधित नुकसानग्रस्त भागांची पाहणी करावी, तसेच प्रत्यक्ष नुकसानीचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**या ग्रामपंचायतींचा पत्रात उल्लेख**

आमदार दौलत दरोडा यांनी दिलेल्या पत्रात वाडा तालुक्यातील चिखले, सारसी-मालोंडे, कोने-विजापूर, कुयलु, आबिटघर, कांबारे, तुसे, खैरे-आंबिवली, गातेस आणि तिळगाव-देवगाव या ग्रामपंचायत क्षेत्रांचा उल्लेख करण्यात आला आहे.या भागातील नुकसानग्रस्त शेतकरी, घरमालक तसेच पोल्ट्रीफार्म व्यावसायिकांचे पंचनामे करून त्यांना नियमानुसार मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार दरोडा यांनी केली आहे.

दरम्यान, वादळी वारा आणि मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून लवकर सुरू होण्याची अपेक्षा नुकसानग्रस्तांकडून व्यक्त होत आहे.

# निवृत्त सैनिकांच्या 'सेकंड करिअर'ला नवी दिशा देणाऱ्या संशोधनासाठी डॉ. सपना कारिया यांना पीएच.डी प्रधान

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** भारतीय संरक्षण दलातील माजी सैनिकांच्या निवृत्तीनंतरच्या करिअर नियोजनाचा सखोल अभ्यास करणाऱ्या सपना अर्जुन कारिया यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मानव संसाधन व्यवस्थापन (Human Resource Management) विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

त्यांच्या "A Study of Post-Retirement Career Mapping for Ex-Servicemen of the Indian Defence Services" या संशोधनातून लष्करी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर माजी सैनिकांसाठी उपलब्ध असलेल्या करिअर संधी, त्यांची कौशल्ये, पुनर्कौशल्य विकास (reskilling), नागरी क्षेत्रातील रोजगाराशी जुळवून घेण्यातील आव्हाने आणि नियोजनबद्ध 'सेकंड करिअर'ची आवश्यकता यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

लष्करी सेवेदरम्यान विकसित




झालेले नेतृत्व, शिस्त, तांत्रिक कौशल्य, निर्णयक्षमता आणि प्रतिकूल परिस्थितीत काम करण्याची क्षमता ही उद्योग व नागरी क्षेत्रासाठी अत्यंत मौल्यवान असूनही, योग्य करिअर मॅपिंगअभावी या क्षमतांचा पुरेसा उपयोग होत नाही, हा महत्त्वाचा मुद्दा या संशोधनातून अधोरेखित करण्यात आला आहे.

या संशोधनाला विशेष महत्त्व देताना मेजर जनरल विक्रम सिंह यांनी आपल्या प्रस्तावनेत (Foreword) नमूद केले आहे की, माजी सैनिकांकडे केवळ कल्याणाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांना देशाची मौल्यवान 'राष्ट्रीय प्रतिभा संपदा' (National Talent Pool) म्हणून पाहण्याची गरज आहे. त्यांचे नेतृत्व, शिस्त, तांत्रिक कौशल्य आणि अनुभव यांचा उद्योग, शिक्षण, प्रशासन आणि समाजाच्या विविध क्षेत्रांत प्रभावी उपयोग होऊ शकतो.

सध्या पहिल्या तुकडीतील अग्निवीर नागरी जीवन आणि रोजगाराच्या दिशेने वाटचाल करत असताना या संशोधनाचे महत्त्व अधिक वाढते, असेही मेजर जनरल विक्रम सिंह यांनी नमूद केले आहे. प्रशिक्षित आणि शिस्तबद्ध तरुणांच्या या मनुष्यबळासाठी व्यवस्थित करिअर मॅपिंग केल्यास त्यांच्या कौशल्यांचा राष्ट्रनिर्मितीसाठी परिणामकारक उपयोग होऊ शकतो.या संशोधनातून पुनर्वसन संस्था, उद्योग, प्रशिक्षण संस्था आणि धोरणकर्ते यांच्यात अधिक प्रभावी समन्वयाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. निवृत्तीनंतरची कारकीर्द ही केवळ रोजगार मिळविण्यापुरती मर्यादित न राहता, माजी सैनिकांच्या अनुभवाला अनुरूप, सन्मानजनक आणि अर्थपूर्ण असावी, अशी भूमिका या अभ्यासातून मांडण्यात आली आहे.

डॉ. कारिया यांनी हे संशोधन प्रा. डॉ. आनंद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्या सध्या Aditya Birla Capital मध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत असून व्यवसाय उत्कृष्टता, धोरणात्मक उपक्रम आणि भागीदारी या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या पुणे विद्यापीठाच्या मास्टर ऑफ पर्सोनल मॅनेजमेंटच्या सुवर्णपदक विजेत्या असून त्यांना १४ वर्षांहून अधिक व्यावसायिक अनुभव आहे.

पीएच.डी. संशोधनाच्या माध्यमातून संरक्षण दलातील अनुभवी मनुष्यबळ आणि नागरी रोजगारविश्व यांच्यातील दरी कमी करण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न डॉ. कारिया यांनी केला आहे.

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त रा.ला.न.प. माध्यमिक कन्या शाळेत विविध उपक्रमांनी उत्साहात कार्यक्रम

महाराष्ट्र जीत

**श. प्र.अब्दुल जुबेर कारंजा (लाड), दि. २ ऑक्टोबर २०२६:** रा.ला.न.प. माध्यमिक कन्या शाळा, कारंजा (लाड) येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर होते. कार्यक्रमास साबळे मॅडम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच ज्येष्ठ शिक्षिका दाभाडे मॅडम, गावंडे मॅडम, बायस्कर मॅडम, बंड मॅडम, दर्शन सर, आडे सर, शितल मॅडम, मोहम्मद बेग मिर्झा यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगमा मॅडम यांनी अतिशय सुंदर पद्धतीने केले, तर आभार प्रदर्शन भेंडेकर मॅडम यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापक जाधव सर यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर, सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि राष्ट्रसेवेच्या विचारांवर मोलाचे मार्गदर्शन केले. गांधीजींच्या विचारांचे विद्यार्थिनींच्या जीवनातील महत्त्व त्यांनी समजावून सांगितले.



कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे शाळेतील कवी म्हणून ओळखले जाणारे आडे सर यांनी आपल्या शाळेवर आधारित सुंदर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या गीताला विद्यार्थिनी व शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थिनींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. गांधीजींच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

"सत्य, अहिंसा आणि मानवतेचा संदेश आपल्या आचरणातून जपूया, " असा संदेश देत महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

## संपादकीय

### टळलेल्या 'अनर्था'चा धडा

नागरी विमान वाहतूक विश्वात सुरक्षिततेची अखेरची अभेद्य तटबंदी म्हणून ज्या रचनेकडे पाहिले जाते, ती म्हणजे विमानातील 'कॉकपिट'चा चिलखती पोलादी दरवाजा. अमेरिकेवरील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यानंतर बाहेरील कोणताही उपद्रवी, अपहरणकर्ता, हल्लेखोर अथवा समाजकंटक चालकाच्या आसनापर्यंत पोहोचता कामा नये, या उद्देशाने विमानांच्या कॉकपिटचे दरवाजे बुलेटप्रूफ, कोड क्रमांकाशिवाय न उघडणारे आणि पूर्णपणे अभेद्य करण्यात आले. परंतु, ज्या वैमानिकांवर आणि त्यांच्या विवेकावर शेकडो निष्पाप जीवांची मदार सोपवलेली असते, त्यापैकीच एकाच्या मनात क्रूर भावना निर्माण झाली तर काय होऊ शकते याचा रक्तरंजित आणि थरकाप उडवणारा अनुभव नुकताच जगाने पाहिला. दुबईहून तेल अवीवच्या दिशेने झेपावलेल्या विमानामध्ये ३० हजार फूट उंचीवर जे काही घडले, त्याने आंतरराष्ट्रीय नागरी विमान सुरक्षेच्या चौकटीला मोठा छेद दिला.

अहमदाबादमधील भीषण विमान अपघात लोकमनातून पुसला गेलेला नाही. विविध कंपन्यांच्या प्रवासी विमानांमध्ये उड्डाणादरम्यान तांत्रिक दोष निर्माण होणे, हवेत इंजिन बंद पडणे, टर्ब्युलन्स अथवा हायड्रॉलिक प्रणाली निकामी झाल्यामुळे इमर्जन्सी लँडिंग या घडामोडी नियमित बनल्या आहेत. ताज्या घटनेने तांत्रिक दोषांपलीकडचे मानवी मानसिकतेचे अतिशय धोकादायक वास्तव समोर आणले. फ्लायदुबईच्या विमानातील घटना दोन वैमानिकांमधील वादंग किंवा वैयक्तिक हेवेदाव्यांचा संघर्ष नव्हता. सुमारे १७५ प्रवाशांना घेऊन चाललेले विमान जमिनीवर वेगाने आदळवून सर्वांचा एकत्रित बळी घेण्याचा विघातक कट होता, असे समोर आले आहे. या थरारात स्मित मच्छार या भारतीय वैमानिकाने दाखवलेला अद्वितीय निर्धार, असीम धैर्य आणि अभूतपूर्व प्रसंगावधान विमान वाहतुकीच्या आणि मानवी इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले जावे असेच आहे. विमान नियमित उंचीवर स्थिर असताना, अचानक सहवैमानिकाच्या मनात विकृती संचारली. त्याने मुख्य वैमानिकावर प्राणघातक हल्ला चढवला. कॉकपिटमधील काही चौरस फुटांच्या चिंचोळ्या जागेत हालचालींनाही मर्यादा असतात. अशा ठिकाणी या अनपेक्षित हल्ल्यात भारतीय वैमानिक गंभीर जखमी झाला. हल्लेखोराने ते महाकाय विमान वेगाने हजारो फूट जमिनीच्या दिशेने नेले.प्रवाशांसाठी तो काळजाचा ठोका चुकवणारा क्षण होता. अशा जीवघेण्या परिस्थितीत, रक्ताच्या थारोळ्यात पडलेले असतानाही, स्मित यांनी केवळ स्वतःचा जीव वाचवण्याचा विचार केला नाही. विमानातील पावणेदोनशे प्रवाशांची जबाबदारी आपल्यावर आहे, याचे विवेकभान ठेवून त्यांनी हा अनर्थ टाळला. प्रचंड संघर्ष करत या शूर वैमानिकाने हल्लेखोर सहवैमानिकाशी प्रतिकार चालू ठेवला. विमानाचे सुकाणू पूर्णपणे त्याच्या नियंत्रणात जाऊ न देता धाडसाने आपत्कालीन संदेश यंत्रणेचा वापर केला. आधी धोक्याचा सामान्य संदेश आणि पाठोपाठ बेकायदेशीर हस्तक्षेप अथवा विमानाचे अपहरण दर्शवणारा आंतरराष्ट्रीय पातळीवरील धोक्याचा '७५००' हा कोड संदेश रडारवर प्रसारित केला.भीषण झटापटीत स्मित यांनी कॉकपिटचा बंदिस्त दरवाजा बाहेरून उघडता येईल, अशी कळ दाबली. त्यामुळे केबिन कर्मचारी आणि धाडसी प्रवासी आत घुसले आणि त्यांनी माथेफिरू हल्लेखोराला जखडले. विमानात उपस्थित पर्यायी वैमानिक पथकाने तत्काळ सूत्रे हाती घेऊन विमानाचा मार्ग बदलला आणि सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर ते सुखरूप उतरवले. अंगभूत शौर्य, साहस असणे आणि बिकट प्रसंगी त्याचा कौशल्यपूर्ण वापर करणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. यातील दुसरी बाब अधिक महत्त्वाची ठरते आणि तीच या भारतीय वैमानिकाने दाखवल्याने सर्व प्रवाशांच्या चेहऱ्यावर मरणाच्या दारातून परतल्याचे 'स्मित' उमलले. जगभरातून या वैमानिकावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. पण या घटनेने विमान वाहतूक विश्वापुढे निर्माण केलेले मूलभूत आणि गंभीर प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाही. गेल्या दोन दशकांत आपण विमानाचे कॉकपिट बाहेरील जगासाठी अभेद्य केले, पण आतील चालकांची माथी भडकल्यास काय होऊ शकते, या संभाव्य धोक्याचा कोणताही विचार जागतिक सुरक्षा प्रणालीने केलेला दिसत नाही.ताज्या घटनेत भारतीय वैमानिकाने दरवाजा उघडण्याची व्यवस्था केली म्हणून प्रवासी बचावले.

# बिबट्या आला रे आला.! (अफवांचा बाजार मांडणाऱ्यांना आवरा; कडक कारवाई गरजेची)

महाराष्ट्र जीत

**उंब्रज/प्रतिनिधी :** अलीकडच्या काळात बिबट्याचा मानवी वस्त्यांमध्ये वावर वाढल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. जंगलालगतची गावे, शेतवस्त्या आणि ऊसाच्या फडांमध्ये बिबट्याचे दर्शन होणे ही बाब आता ग्रामीण भागासाठी नवी राहिलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहणे, रात्रीच्या वेळी काळजी घेणे आणि वनविभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. मात्र, या खरीखुऱ्या परिस्थितीचा गैरफायदा घेत 'बिबट्या आला रे आला' म्हणून खोट्या अफवांचा धुरळा उडविणाऱ्यांनी आता कहर केला आहे.

'आमच्या घराची खिडकी उघडली तर शेजारच्या शेतात बिबट्या निवांत बसला होता', 'गावच्या रस्त्यावर बिबट्या फिरत होता', 'अमुक व्यक्तीच्या घराच्या अंगणात बिबट्या आला', अशा स्वरूपाच्या अफवा काही जण कोणतीही खात्री न करता सोशल मीडियावर फिरवत आहेत. एखादा कुत्रा, मांजर, शेळी किंवा अंधारात दिसलेली सावलीही काहींच्या कल्पनेत क्षणात बिबट्या बनते. मग सुरू होतो तो मोबाईलवरून अफवा पसरविण्याचा खेळ!

'उंदराला मांजराची उपमा आणि मांजराला वाघाची! ' अशी काहींची अवस्था झाली आहे. स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेले नाही, वनविभागाची खात्री नाही, प्रत्यक्ष पुरावा नाही; तरीही 'बिबट्या दिसला' असा संदेश पुढे ढकलायचा. एकाने सांगितले म्हणून दुसऱ्याने, दुसऱ्याने सांगितले म्हणून तिसऱ्याने आणि पाहता पाहता संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण करायचे. ही प्रवृत्ती आता थांबणे गरजेचे आहे.

बिबट्या प्रत्यक्षात दिसल्यास त्याची माहिती तातडीने वनविभाग किंवा संबंधित प्रशासनाला देणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मात्र, अफवा पसरवणे ही ना शौर्याची निशाणी आहे, ना मनोरंजनाचा प्रकार. अशा अफवांमुळे लहान मुले, महिला, वृद्ध तसेच शेतकरी भयभीत होऊ शकतात. रात्रीच्या वेळी अनावश्यक गर्दी जमू शकते, लोकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो आणि वन्यप्राण्याबाबतही चुकीची प्रतिक्रिया उमटू शकते.

गावाकडे एक म्हण आहे— 'उगाचच्या वावड्या आणि चुलीवरच्या काड्या, दोन्ही घर पेटवतात! ' अफवा नेमकी अशीच असते. सुरुवातीला ती एखाद्या मोबाईलच्या पडद्यावर जन्म घेते आणि काही क्षणांत गावोगावी पसरून सामाजिक वातावरण पेटवते.

काहींना मात्र दुसऱ्यांच्या भीतीतही विकृत आनंद मिळतो. स्वतः घरात सुरक्षित बसायचे आणि मोबाईलवर 'बिबट्या दिसला', 'बिबट्या घराजवळ आला', 'सगळ्यांनी घराबाहेर पडू नका' अशा संदेशांचा भडिमार करायचा. 'आपलं काम भलं आणि आपली शेती भली' एवढ्यावर न थांबता दुसऱ्यांच्या जीवाशी आणि मानसिक शांततेशी खेळण्याचा हा प्रकार निंदनीय आहे.

'आगीत तेल ओतायचे आणि मग धूर पाहून तमाशा बघायचा', अशी ही वृत्ती आहे. अशा लोकांना अफवा पसरवून मिळणारा क्षणिक असुरी आनंद समाजासाठी मात्र मोठी डोकेदुखी ठरतो. त्यामुळे अशा अपप्रवृत्तींना वेळीच लगाम घालणे आवश्यक आहे.

बिबट्या हा वन्यजीव आहे. त्याचा अधिवास, वर्तन आणि मानवी वस्तीत येण्यामागची कारणे याबाबत वनविभागाकडून जनजागृती होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासली पाहिजे. 'दिसलं म्हणून खरं आणि ऐकलं म्हणून पुढे' ही मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे.

प्रशासनानेही सोशल मीडियावरून जाणीवपूर्वक खोट्या अफवा पसरवून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्यांवर उपलब्ध कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. अफवा पसरविणाऱ्यांना वेळीच चाप बसला, तरच खऱ्या वन्यजीव दर्शनाच्या घटनांमध्ये नागरिक प्रशासनाला योग्य सहकार्य करतील.

कारण बिबट्या जंगलातून गावात आला तर सावध व्हायचे असते; पण अफवांचा बिबट्या मोबाईलमधून गावात आला तर त्याला थांबवायचे असते!

'चोराच्या मनात चांदणे' म्हणतात; पण अफवा पसरविणाऱ्यांच्या मनात काय असते, हे गावकऱ्यांनीच ओळखावे.

सतर्कता हवी, सावधगिरी हवी; पण त्यासोबत शहाणपणही हवे. बिबट्याच्या भीतीवर अफवांचा बाजार मांडणाऱ्यांना आता प्रशासनाने आणि समाजानेही ठामपणे 'बस्स झाले! ' असे सांगण्याची गरज आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) अभ्यास केंद्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधीसंजय वानखेडे :** - स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्थाद्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) अभ्यास केंद्रात ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन अभ्यासकेंद्र प्रमुख तथा प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. प्रथम ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक ग्रंथपाल डॉ. अरविंद विमल संभाजी पाझारे भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील विविध



शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठाची भूमिका, अभ्यासक्रम निर्मितीमागील प्रयोजन, अभ्यासकेंद्राची व समन्वयकाची भूमिका, अभ्यासक्रमाचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, असाइनमेंट लेखन, परीक्षेची तयारी, संदर्भ साहित्याचा वापर, ई-संसाधने, डिजिटल ग्रंथालय तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय क्षेत्रातील उपयोग याबाबत याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक ज्ञानासोबतच डिजिटल लायब्ररी, ई-रिसोर्सेस, माहिती व्यवस्थापन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचे डॉ. अरविंद पाझारे यांनी सांगितले. यासोबतच डॉ. नितेश चोरे आणि डॉ. दिनेश साखरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थी उपस्थित राहिले तर कसे फायदे होतात. संपर्क सत्रातील मार्गदर्शनाचे फायदे, विविध उदाहरणाच्या माध्यमातून समजावून सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक प्रश्न विचारून त्यांचे निरसन करून घेतले. मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, अध्ययन साहित्याचा प्रभावी वापर आणि सातत्यपूर्ण अभ्यास यामुळे शैक्षणिक प्रगती साधता येते, असेही मार्गदर्शन करण्यात आले.

## वीरेगावच्या महामार्गावर अतिक्रमणाला 'ब्रेक'!

### ९ ते १० जेसीबींच्या सहाय्याने दुकाने, पानटपऱ्या व हातगाड्यांवर धडक कारवाई

महाराष्ट्र जीत

**जालना: ज्ञानेश्वर पवार :** मुंबई–हैदराबाद महामार्गावरील वीरेगाव, ता. जालना, जि. जालना येथे गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी अतिक्रमणाविरोधात प्रशासनाने धडक मोहीम राबविली. तब्बल ९ ते १० जेसीबींच्या सहाय्याने महामार्गालगतची दुकाने, पानटपऱ्या, हातगाडे तसेच रस्त्याच्या हद्दीत आलेली इतर अतिक्रमणे हटविण्यात आली.

वीरेगाव परिसरातून जाणाऱ्या मुंबई–हैदराबाद महामार्गालगत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. अनेक ठिकाणी दुकाने व पानटपऱ्यांसह हातगाडे रस्त्यालगत आल्याने वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली.

कारवाईदरम्यान जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमित बांधकामे व साहित्य हटविण्यात आले. एकाच वेळी मोठ्या संख्येने जेसीबी दाखल झाल्याने परिसरात या कारवाईची जोरदार चर्चा होती. महामार्गालगतचा परिसर मोकळा झाल्याने वाहतुकीसाठी अधिक जागा उपलब्ध झाली आहे.

**वाहतूक सुरळीत होण्यास मदत**

महामार्गावरील अतिक्रमणामुळे



वाहतुकीला निर्माण होणारे अडथळे दूर झाल्याने वाहनचालकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. तसेच महामार्गालगत मोकळी जागा उपलब्ध झाल्याने वाहतूक सुरळीत होण्यास आणि अपघातांचा धोका कमी करण्यास मदत होणार, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, अतिक्रमण हटविल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

महामार्ग मोकळा, वाहतूक सुकर करण्याच्या दिशेने प्रशासनाची महत्त्वपूर्ण पावले!

## किनवटच्या शनिवार पेठेत वाघाची दहशत; बैलावर हल्ला

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी: शेख मोईन**

किनवट: किनवट शहरापासून अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या शनिवार पेठ शिवारात दिवसाढवळ्या वाघाने शेतात चरत असलेल्या बैलावर हल्ला करून त्याला ठार केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



संजय स्वामी यांच्या शेतात बैल चरत असताना अचानक वाघाने त्याच्यावर झडप घातली. या हल्ल्यात बैलाचा जागीच मृत्यू झाला. दिवसाढवळ्या मानवी वस्तीच्या जवळच हिंस्र प्राण्याने केलेल्या या हल्ल्यामुळे वन्यप्राण्यांचा वावर आता नागरी वस्त्यांच्या दिशेने वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच शेतकरी आणि नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या शेतकरी, मजूर तसेच गुरे चारण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, लहान मुले व महिलांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

वाघाचा तातडीने शोध घेऊन त्याला जेरबंद करावे, तसेच हल्ल्यात बैल गमावलेल्या शेतकरी संजय स्वामी यांना शासनाच्या नियमानुसार तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी केली आहे.

वनविभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करावी, वाघाच्या हालचालींचा माग काढण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## श्री गजानन महाराज विहीरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील पुलाच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

### पाच कोटींहून अधिक रुपयांच्या निधीतून सुरू असलेल्या कामाची चौकशी करण्याची नागरिकांची मागणी

महाराष्ट्र जीत

**अकोट प्रतिनिधी:सैय्यद मज़हर अली :** अकोट तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री संत गजानन महाराज विहीर संस्थेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील पुलाच्या सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्जाबाबत परिसरातील नागरिक आणि भाविकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शासनाच्या पाच कोटींहून अधिक रुपयांच्या निधीतून हे काम सुरू असल्याची माहिती असून, कामाची गुणवत्ता आणि वापरण्यात येणाऱ्या साहित्याची वरिष्ठ स्तरावरून तपासणी करण्याची मागणी होत आहे.

श्री संत गजानन महाराज विहीर हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, या ठिकाणी दररोज मोठ्या संख्येने भाविक तसेच शेतकरी ये-जा करतात. त्यामुळे या मार्गावरील पुलाचे बांधकाम दर्जेदार आणि सुरक्षित पद्धतीने होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



दरम्यान, सुरू असलेल्या बांधकामात वापरण्यात येणारे लोखंड, सिमेंट तसेच इतर साहित्याच्या गुणवत्तेबाबत काही नागरिकांनी शंका उपस्थित केली आहे. काम मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदी आणि संबंधित बांधकाम विभागाच्या तांत्रिक निकषांनुसार होत आहे किंवा नाही, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

पुलाच्या बांधकामाची गुणवत्ता योग्य प्रकारे तपासली गेली नाही तर भविष्यात पुलाच्या मजबुतीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने कामाची तांत्रिक तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. विशेषतः पावसाळ्यात नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढल्यानंतर पुलावर येणारा ताण लक्षात घेता बांधकामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



या कामात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली आहे किंवा नाही, याबाबत अधिकृत निष्कर्ष काढण्यापूर्वी संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून बांधकामाचे मोजमाप, वापरलेले साहित्य आणि कामाची गुणवत्ता यांची तांत्रिक तपासणी करणे आवश्यक आहे. दोष आढळल्यास नियमानुसार संबंधितांवर कारवाई करावी आणि आवश्यक असल्यास कामात सुधारणा करून घ्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिक आणि भाविकांकडून होत आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून पुलाचे बांधकाम शासनाच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार, तांत्रिक निकषांनुसार आणि आवश्यक गुणवत्तेच्या साहित्याचा वापर करून पूर्ण केले जात आहे किंवा नाही, याबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

**"श्री संत गजानन महाराज विहिरीकडे जाणारा मार्गावरील नदीवरील पाच कोटींहून अधिक निधीच्या पुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, लोखंडासह सिमेंट सुद्धा बोगस दिसून येत आहे. विकासाच्या नावावर कोटी रुपयांचा चुराडा होत असून शासन देखील बहिरेपणाचे सोंग घेत आहे. या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून परिपत्रकानुसार काम करावे."**

**गजानन सुरत्ने, भाविक भक्त, अकोट**

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# अखिल महाराष्ट्र कोष्टी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष सतीश दाभाडे यांनी समाज बांधवांचे मानले आभार

महाराष्ट्र जीत

**नागपूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर):** सर्व समाज बांधवांना आणि भगिनींना सतीश दाभाडे यांचा मनःपूर्वक नमस्कार अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने येवला, जिल्हा नाशिक, येथील माता चौंडेश्वरी च्या साक्षीने आणि सर्व संमतीने माझी प्रदेशाध्यक्ष म्हणून दिनांक ११ सप्टेंबर २०२२ रोजी निवड झाली होती.उपस्थित सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी माझी प्रदेशाध्यक्षपदी एक मताने जेव्हा माझी निवड केली तेव्हाच खऱ्या अर्थाने मी भारावून गेलो होतो. प्रदेश अध्यक्ष पदाची जबाबदारी आपण सांभाळू किंवा नाही? ! याबाबत, मी स्वतः चिंताग्रस्त होतो. परंतु, चौंडेश्वरी मातेच्या कृपेने आणि सर्व समाज बांधवांच्या सहकार्याने मी माझा कार्यकाळ पूर्ण करू शकलो याचे मला समाधान आहे.गेल्या दोन वर्षांपूर्वी कमरेच्या त्रासामुळे माझ्या स्पाईनची मला शस्त्रक्रिया करावी लागली. डॉक्टरांच्या सल्ल्यामुळे मी बरेच महिने बेडवरच होतो.बाहेरचा प्रवास मी करू शकत नव्हतो, अशावेळी आपण आता प्रदेश अध्यक्ष पदाची जबाबदारी इतर कोणावर द्यावी असा विचार माझ्या मनामध्ये आला होता, सदर विचार मी आदरणीय श्री. अरुण भाऊ वरोडे, यांच्याकडे व्यक्तही केला होता, परंतु त्यांनी नम्रतेने नकार दिला. जेवढे काम होईल तेवढे करा बाकी आम्ही सांभाळून घेतो असा विश्वास त्यांनी दिल्यानंतर मी माझ्या शारीरिक क्षमतेनुसार व शस्त्रक्रियेची अडचण लक्षात घेऊन फक्त विदर्भात परिषदेचे कार्य करण्याचा ठाम निर्णय घेतला.-! तत्पूर्वी, माझी प्रदेश अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर संपूर्ण राज्यातील पदाधिकाऱ्यांची नेमणूक परिषदेच्या सर्व ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. राज्यस्तरीय, विभागस्तरीय, तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका, सोबतच महिला पदाधिकाऱ्यांच्या, युवा पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका हा सुद्धा संघटनेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा भाग असल्यामुळे महिला अध्यक्ष आणि युवा अध्यक्षांना सोबत घेऊन त्याही नेमणुका करण्यात आल्या. विशेष महत्त्वाचे म्हणजे, बऱ्याच पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी पदे मिळण्याबाबत माझ्याकडे आग्रह केला. आणि माझ्या दृष्टीने हा आग्रह संघटनेच्या उत्साहात भर टाकणारा होता.सर्व पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्यानंतर परिषदेच्या धोरणानुसार नागपूर, येथील एका प्रशस्त हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित करून सर्वांना सामूहिक शपथ देण्याचा कार्यक्रम आणि पदभार स्वीकारण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याच कार्यक्रमांमध्ये विदर्भातील मान्यवर समाज बांधवांचा, दिवंगत समाज बांधवांचा सन्मान स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला.विशेष म्हणजे या कार्यक्रमाकरिता फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. अरुण भाऊ वरोडे, हे स्वतः उपस्थित होते. राज्यातील जवळजवळ-चारशे प्रतिनिधी या पदग्रहण समारंभाच्या कार्यक्रमा करिता आवर्जून उपस्थित होते. त्यानंतर, परिषदेच्या वतीने विदर्भातील तरुणांना रोजगार मिळावा, त्यांनी स्वतः व्यवसाय करावा याकरिता महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे सहकार्य घेऊन नागपूर, येथील औद्योगिक परिसरा मध्ये असलेल्या त्यांच्या कार्यालयामध्ये एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये विदर्भातील ५० ते ६० युवक आणि युवती सहभागी झाले होते.महा ज्योती, च्या मार्फत एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांना सवलती प्राप्त आहे. या सवलती एसबीसी संवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मिळाव्यात याकरिता संबंधित महाज्योतीच्या महासंचालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले.भेटीच्या माध्यमातून दिलेल्या लेखी




निवेदनामुळे महा ज्योतीच्या कार्यालयाने सुद्धा एसबीसीच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न केला. मुंबई- ठाणे येथील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रथमच आयोजित केलेल्या कार्यक्रमास माझ्यासह राष्ट्रीय अध्यक्ष, आणि इतर जेष्ठ पदाधिकारी सुद्धा ठाणे या ठिकाणी आवर्जून उपस्थित होते. नागपूर येथेच माझ्या कमल सेलिब्रेशन मध्ये राज्यस्तरीय कार्यशाळा सुद्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये तरुणांचा सहभाग लक्षणीय होता.नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना विनकर महामंडळ स्थापन करण्याबाबत लेखी निवेदनाच्या माध्यमातून विनंती करण्यात आली. आणि कालांतराने शासनाने विणकर महामंडळ स्थापन करण्याची घोषणा सुद्धा केली.इतकेच नव्हे तर, एसबीसी आरक्षणाला कुठल्याही प्रकारचा कायदेशीर धक्का लागणार नाही याबाबत सुद्धा पुढच्या हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय सामाजिक न्याय मंत्री, विविध लोकप्रतिनिधी, यांना लेखी निवेदन परिषदेच्या वतीने देण्यात आले.-७ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण देशात हातमाग आणि विणकर दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने परिषदेच्या वतीने संपूर्ण राज्यात वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून हातमाग दिवस दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केल्या गेला.यामध्ये प्रामुख्याने, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या समाज बांधवांचा सत्कार, ज्येष्ठ समाज बांधवांचा आणि भगिनींच्या सत्काराचे आयोजन, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, कुठे कुठे चर्चासत्र, व्याख्याने, समाज एक संघ ठेवण्यासंदर्भात कार्यक्रम, प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.महिला संघटनेच्या वतीने सुद्धा संपूर्ण राज्यात वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन वेळोवेळी करण्यात आले. विशेषता, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येवला या ठिकाणी भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. युवा संघटनेच्या वतीने सुद्धा युवा अध्यक्षांनी पुढाकार घेऊन सोलापूर, सारख्या शहरांमध्ये संपूर्ण राज्यातील कर्तृत्ववान मुलांचा सत्कार सोहळा आयोजित केला.हे कार्यक्रम निश्चितच परिषदेच्या वैभवा त आणि कार्यात भर घालणारे होते.महिला अध्यक्षांनी तर आपला नोकरी पेशा सांभाळून संपूर्ण राज्यात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी जीवाचे रान केले.युवा अध्यक्षांनी सुद्धा समाजातील युवक परिषदेच्या कार्यात कसे जोडल्या जाईल याबाबत सातत्याने प्रयत्न केले. काही ठिकाणी प्रोफेशनल ग्रुपच्या माध्यमातून सुद्धा समाज बांधवांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. समाजामध्ये जे व्यावसायिक बांधव आहेत त्यांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न प्रोफेशनल ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने करण्यात आला.बऱ्याच ठिकाणी विशेषता ज्या ठिकाणी समाज बांधव मोठ्या संख्येने आहेत त्या ठिकाणी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने कार्यक्रम घेतले. काही ठिकाणी परिषदेचे सहकार्य घेऊन वर वधू परिचय मेळावे सुद्धा भव्य प्रमाणात आयोजित करण्यात आले.गेल्या वर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विदर्भातील दारव्हा, जिल्हा यवतमाळ, या ठिकाणी भव्य प्रमाणात महिला मेळावा परिषदेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता समाजाचे धर्मगुरू आदरणीय परमपूज्य श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामी महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय पदाधिकारी, राज्यस्तरीय पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. याच कार्यक्रमांमध्ये संपूर्ण राज्यातील जवळजवळ ६० कर्तुत्वान महिलांचा परमपूज्य स्वामीजींच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.याच कार्यक्रमांमध्ये, समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही मान्यवर पुरुषांचाही परिषदेच्या वतीने सन्मान करण्यात आला. परिषदेच्या वतीने दारव्हा, या ठिकाणी कोष्टी समाजाची काशी करण्याचा संकल्प जाहीर करण्यात आला. हा संकल्प सुद्धा येत्या काही दिवसात तडीस जाईल याचा आम्हाला विश्वास आहे. अचलपूर, जिल्हा अमरावती, येथील समाज बांधवांनी अचलपूर या ठिकाणी आयोजित केलेल्या कार्यक्रमा मध्ये सुद्धा समाजाचे धर्मगुरू, राष्ट्रीय अध्यक्ष आणि परिषदेचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने मी हजर होतो.सूरताल, या समाजातील सांस्कृतिक समूहाला सुद्धा बळ देण्याचे काम परिषदेने कायमस्वरूपात केले. या माध्यमातूनच आपल्या समाजातील कलावंतांचा परिचय होण्यास मदत झाली. समाजामध्ये आज असंख्य समस्या आहेत त्या समस्येवर सविस्तर चर्चा व्हावी म्हणून यवतमाळ या ठिकाणी दोन दिवसाची कार्यशाळा सुद्धा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. परंतु, स्थानिक आयोजकांना याबाबत असंख्य अडचणी आल्यामुळे सदर कार्यशाळा नियोजित वेळेत होऊ शकली नाही परंतु या अनुषंगाने समाजाच्या समस्येवर सातत्याने चर्चा करण्यात आली. नागपूर येथील स्थानिक संघटनेचे सहकार्य घेऊन परिषदेने सातत्याने वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले.बऱ्याच कार्यक्रमात राष्ट्रीय अध्यक्ष, राज्यस्तरीय पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. लातूर, येथील चौंडेश्वरी फाउंडेशनच्या उपक्रमास सातत्याने प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. समाजातील ज्या कर्तुत्वान पुरुष किंवा महिला मंडळीचा वाढदिवस असेल तर त्यांच्या कार्याचा परिचय सर्व समाजाला व्हावा या अनुषंगाने परिषदेच्या वतीने प्रयत्न केला. माझ्या, कार्यकाळात मी समाजाची सेवा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. बऱ्याच दानशूर व्यक्तींनी आर्थिक मदत करण्यास मागेपुढे पाहिले नाही. सर्वांच्या सहकार्यामुळे प्रत्येक कार्यक्रम परिषद यशस्वी करू शकली.राज्यातील पदाधिकाऱ्यांनी सुद्धा माझ्या प्रत्येक कृतीचे समर्थन केले. मनापासून पाठिंबा दिला, प्रसंगी शाबासकी सुद्धा दिली. सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शक करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. संपूर्ण राज्यातील समाज बांधवांनी सुद्धा परिषदेच्या प्रत्येक कार्यात सहभागी होण्याचा शंभर टक्के प्रयत्न केला. महिला संघटना, युवा संघटना, प्रोफेशनल ग्रुप यांनी सुद्धा वेळोवेळी मला व परिषदेला मनापासून सहकार्य केले. राष्ट्रीय फेडरेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी मनापासून सहकार्य केले. प्रसिद्धी विभागाची जबाबदारी ज्या पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती त्या सर्व प्रसिद्धी प्रमुखांनी परिषदेच्या कार्याची वेळोवेळी प्रसिद्धी दिली. नागपूर, वाशिम, येथील समाज बांधवांनी तर मला सातत्याने सहकार्य केले. आज, माझ्या कार्याचा शेवटचा दिवस आहे. पुढील अध्यक्ष सुद्धा परिषदेचे कार्य अतिशय जोमाने करतील असा विश्वास मला आहे. आदरणीय श्री. अरुण भाऊ वरोडे, आदरणीय श्री. नारायणराव वड्डे, आदरणीय श्री. पंडितराव इदाते, आदरणीय श्री. विष्णू भाऊ कुटे, आदरणीय श्री. रमेश भाऊ घटे, आदरणीय श्री. अशोकराव सपाटे, आदरणीय सौ. मंदाकिनी ताई टकले, युवा अध्यक्ष श्री. विजय कलढोने, आणि राज्यातील आपल्या समाजाच्या सर्व संस्था त्यांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या, युवा कार्यकर्ते व हितचिंतक या सर्वांचे मी मनापासून आज जाहीर आभार मानत आहे. पुनश्च, सर्व समाज बांधवांना, भगिनींना मला जी समाजाची सेवा करण्याची संधी आपण उपलब्ध करून दिली आणि या माध्यमातूनच सर्वांनी मला भरभरून प्रेम दिले, आशीर्वाद दिले त्याबद्दल जाहीर आभार! आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाचे धर्मगुरू आदरणीय श्री. श्री. श्री. दयानंद पुरी स्वामी महाराज यांनी मला कायम आशीर्वाद देऊन प्रेरित केले त्याबद्दल स्वामीजींचेही मनापासून आभार.! -

या पुढे ही तुमच्या सोबतच असणार आहे, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर संघटनेचे कार्य तनमनधनाने करीत राहीन याची ग्वाही या निमित्ताने देत आहे.

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त कारंजा लाड शहर काँग्रेस कमिटीचा अभिवादन कार्यक्रम

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड:** कारंजा लाड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी दोन्ही महान नेत्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमास ज्येष्ठ नेते तथा माजी नगर परिषद अध्यक्ष अरविंदजी लाठिया, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अब्दुल राजीक







शेख, सेवादल काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विजय कडू, शहर अध्यक्ष प्रदीप वानखाडे, शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस राम शेजाव सर, दिलीप भाऊ रोकडे पाटील, मनोज भाऊ कानकिरड, शहर अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष असलम खान, तसेच लखन भाऊ घारू, सागर पचपुते, राहील खान, समीर भाई यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्रीजी यांच्या राष्ट्रसेवा, सत्य, अहिंसा आणि साधेपणाच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले.

## रिपाई– आठवले सोशल मिडिया आयटी सेल नाशिक ज़िल्हा उत्तर महाराष्ट्र प्रदेश नामदार रामदासजी आठवले साहेबांचा झंजावती नाशिक दौरा संपन्न

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** नामदार रामदासजी आठवले साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक मध्ये रिपाई उद्योजक सेलची स्थापना. रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय व आधिकारिता राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले साहेब नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले असता जिल्हाध्यक्ष संजयजी (नाना) भालेराव मा.नगरसेवक व शहराध्यक्ष अर्जुन नाना पगारे यांनी आठवले साहेबांना पगडी कोट व शाल)देऊन साहेबांचे स्वागत केले.शासकीय विश्रामगृह गोल क्लब मैदान याठिकाणी साहेबांची

पत्रकार परिषद झाली. पत्रकार परिषदेत जातीनिहाय जनगणना झाल्याशिवाय उपवर्गिकरण करू नये अशी आग्रही मागणी केली. तसेच येणाऱ्या जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना सज्ज होण्याचे आदेश दिले. तसेच ओझर विमानतळाला दादासाहेब



गायकवाड यांचे नाव देण्याची आग्रही मागणी केली. तसेच 03 ऑक्टोबर रोजी पक्षाचा वर्धापन दिन वाशी नवीमुंबई येथे जल्लोषात साजरा होणार आहे त्यासाठी नाशिक जिल्ह्यातील सर्व आघाड्यांच्या कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आदेश नामदार रामदासजी आठवले साहेबांनी दिले. पत्रकार परिषदेत पक्षाचे नाशिक जिल्हा निरीक्षक समाजभूषण काकासाहेब खंबाळकर, श्रीकांतजी भालेराव, विश्वनाथ काळे, जिल्हाध्यक्ष संजयजी (नाना) भालेराव, शहराध्यक्ष अर्जुननाना पगारे आकाश घुसळे महेंद्र सोनवणे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**त्यानंतर नाशिक द्वारका येथील हॉटेल कोर्टयार्ड येथे**

बिझनेस हब मिटिंग पार पडली त्याठिकाणी नाशिक येथील उद्योजकांनी आठवले साहेबांच्या उपस्थितीत रिपाई उद्योजक सेलची स्थापना करण्यात आली.

**सांत्वन पर भेट.**

रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे नेते रामबाबा पठारे यांचे लहान बंधू कालकथीत नितीनजी पठारे यांचे रविवारी दुःखद निधन झाले आठवले साहेबांनी त्यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देऊन पठारे कुटुंबियांचे सांत्वन केले.

याप्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, सर्व आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी व महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या.

## हीच का सांप्रदायिक शिकवण? (खायचे दात वेगळे अन् दाखवायचे वेगळे! )

महाराष्ट्र जीत

**उंब्रज/प्रतिनिधी :** एका आटपाट नगरात सांप्रदायिक शिकवणीचा मुखवटा चेहऱ्यावर चढवून जगाला ब्रह्मज्ञान शिकवणारी एक प्रवृत्ती सध्या आपल्या विरोधाभासी वर्तनामुळे चर्चेचा विषय ठरत आहे. तोंडाने अध्यात्माच्या गप्पा आणि प्रत्यक्ष कृती मात्र त्याच्या अगदी उलट! मग प्रश्न पडतो—हीच का सांप्रदायिक शिकवण? की केवळ लोकांना दाखवण्यासाठी पांघरलेला मुखवटा?

**‘लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण’ ही म्हण अशा दांभिक वर्तनाला अगदी चपखल लागू पडते.**

एका बाजूला देव कुठे शोधायचा, आत्म्यात शोधा, चराचरात शोधा, सृष्टीच्या कणाकणात देव आहे, प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचा अंश आहे, अशी शिकवण समाजाला द्यायची; आणि दुसऱ्या बाजूला घराच्या आसपास फिरणाऱ्या मुक्या जीवांवर मारझोड करायची—हा विरोधाभास केवळ खटकणारा नाही, तर अध्यात्माच्या नावालाच प्रश्न विचारणारा आहे.

**देव दगडात दिसतो, पण जिवंत जीवात दिसत नाही, तर त्या भक्तीचा उपयोग काय?**

मंदिराच्या गाभाऱ्यात दिवा लावणे सोपे आहे; पण एखाद्या भुकेल्या जीवाला घास देण्यासाठी मनात माणुसकीचा दिवा पेटवावा लागतो. देवाच्या मूर्तीला फुले वाहणे सोपे आहे; पण रस्त्यावरच्या मुक्या प्राण्याला दगडाऐवजी मायेचा हात देणे ही खरी कसोटी आहे.

**देवाला नैवेद्य दाखवताना समोरच्या जीवाला लाथ मारली, तर देव नेमका कुठे शोधायचा?**

अध्यात्म म्हणजे केवळ मोठमोठ्या शब्दांचा बाजार नाही. कपाळावर टिळा, गळ्यात माळ, तोंडात धार्मिक शिकवण आणि कृती मात्र क्रौर्याची—याला अध्यात्म म्हणायचे की दिखाऊपणा?

**गावाकडं म्हणतात, ‘बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात! ’**

काहींच्या बाबतीत तर बोलण्यात एवढे ब्रह्मज्ञान असते की, ऐकणाऱ्याला वाटावे साक्षात ज्ञानेश्वरच अवतरले; पण वागण्यात मात्र साधी माणुसकीही दिसत नाही.

**आणखी एक म्हण आहे—‘शितावरून भाताची परीक्षा होते.’**

मोठमोठ्या प्रवचनांपेक्षा छोट्या-छोट्या कृती माणसाचे खरे संस्कार सांगतात. मुक्या प्राण्याशी आपण कसे वागतो, घरातील दुबळ्या माणसाशी कसे बोलतो, आपल्यापेक्षा कमी ताकदीच्या व्यक्तीशी कसा व्यवहार करतो—यातूनच खरी संस्कृती उघडी पडते.

स्वतःला इतरांपेक्षा शहाणे, श्रेष्ठ आणि संस्कारी समजण्याचा अहंकारही तितकाच धोकादायक आहे. ‘अति तेथे माती’ ही म्हण केवळ इतरांसाठी नसते; ती आरसा असते—कधी कधी स्वतःकडेही पाहण्यासाठी!

‘माझ्यासारखे विचार कोणाचे नाहीत’, ‘माझे कुटुंब सर्वगुणसंपन्न’, ‘आमची प्रतिष्ठा सर्वांत मोठी’ अशा पोकळ बडेजावाने माणसाची उंची वाढत नाही. माणूस किती मोठा आहे हे त्याच्या घराच्या भिंती सांगत नाहीत; त्याचे आचरण सांगते.

**गावात एक म्हण प्रचलित आहे—‘उंच घर, पोकळ वासा! ’**

बाहेरून थाटमाट मोठा, पण आतून माणुसकीचा दिवा विझलेला असेल, तर त्या प्रतिष्ठेचा उपयोग तरी काय?

**खरे अध्यात्म माणसाला नम्र करते.**

**खरे ज्ञान माणसाला संवेदनशील करते.**

**खरी सांप्रदायिक शिकवण माणसाला प्रत्येक जीवाचा आदर करायला शिकवते.**

**ज्याला देव चराचरात दिसतो, त्याला रस्त्यावरील मुक्या जीवातही देवाचा अंश दिसला पाहिजे.**

कारण धर्माची खरी परीक्षा मंदिरात होत नाही; ती आपल्या रोजच्या वागण्यात होते. प्रवचनाच्या व्यासपीठावर नाही, तर घराच्या उंबरठ्यावर होते. देवासमोर हात जोडण्यात नाही, तर दुर्बल जीवावर हात उगारताना तो हात थांबवण्यात होते.

म्हणूनच स्वतःला धार्मिक, सांप्रदायिक किंवा संस्कारी म्हणवून घेण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःला एकच प्रश्न विचारावा—

**‘मी जे इतरांना शिकवतो, तेच माझ्या आचरणात आहे का? ’**

**नसेल तर दोष देवाच्या शिकवणीत नाही; दोष आपल्या दांभिकपणात आहे.**

‘दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते; पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही, ’ अशी अवस्था होऊ नये. कारण समाजाला उपदेश करण्यापूर्वी स्वतःच्या आचरणाचा हिशेब देणे गरजेचे आहे.

**शेवटी एवढेच—**

तोंडाने ‘देव चराचरात आहे’ म्हणायचे आणि कृतीने चराचरातील एका जीवाला त्रास द्यायचा, तर ही भक्ती नव्हे; हा विरोधाभास आहे.

खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे असतील, तर मुखवटा कितीही सुंदर असला तरी काळाच्या आरशात चेहरा लपून राहत नाही!

# मातृतीर्थ बुलढाणा नगरीत महार रेजिमेंटचा ८६ वा वर्धापन दिन उत्साहात; यश सिद्धी सैनिक सेवा संघाने जपली 'जय जवान जय किसान' ची परंपरा

महाराष्ट्र जीत

**बुलढाणा (प्रतिनिधी बाबासाहेब जाधव)-** भारतीय सैन्याचा मानबिंदू असलेल्या महार रेजिमेंटचा ८६ वा स्थापना दिवस ऐतिहासिक बुलढाणा नगरीत काल मोठ्या देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि हर्षोल्हासात संपन्न झाला.

महार रेजिमेंटचा गौरवशाली इतिहास प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा, या एकमेव उद्देशाने यश सिद्धी सैनिक सेवा संघाने १ ऑक्टोबर २०२१ रोजी बुलढाण्यातून राज्यस्तरीय स्थापना दिवस साजरा करण्याची परंपरा सुरू केली होती. आज त्याच परंपरेचे रूपांतर एका भव्य सैनिक उत्सवात झाले आहे. यंदाही संघाने नेत्रदीपक सोहळ्याचे आयोजन करून 'जय जवान जय किसान' हा मंत्र प्रत्यक्षात उतरवला.

जयस्तंभ चौकातून शहीद सन्मान रॅली:

सकाळी जयस्तंभ चौकातून शहीद सन्मान रॅलीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या रॅलीत युद्धवीर, ज्येष्ठ सैनिक आणि शहीद कुटुंबीयांची खुल्या जीपमधून मिरवणूक काढण्यात आली. सुभेदार रामजी बाबा सपकाळ आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचा भव्य रथ सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. घोडेस्वार पथक, कार आणि बाईकस्वार माजी सैनिक, तसेच NCC आणि राजीव गांधी मिलिटरी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध पथसंचलन हे रॅलीचे मुख्य आकर्षण होते.




त्यानंतर कार्यक्रमस्थळी ज्येष्ठ सैनिकांच्या हस्ते शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करण्यात आले आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महार रेजिमेंटचा ध्वज मोठ्या अभिमानाने फडकवण्यात आला.

दिग्गजांची उपस्थिती:

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सुभेदार मेजर रामभाऊ इंगळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे आयुध भांडाराचे अभियंता कर्नल विनोद गवई, महा सैनिक प्रशिक्षण केंद्राचे संचालक कर्नल शेजव, कर्नल व्हेटर्न नवनीत दुग्गल, शेतकरी नेते रविकांत तुपकर, धम्मसेवक तथा समाजभूषण, भिमरत्न पुरस्कार प्राप्त भैयासाहेब पाटील, सुभेदार मेजर जयसिंग सोरटे, सुभेदार मेजर त्रंबक इंगळे, सुभेदार के.एम. हेलोडे, मराठा नेते रामभाऊ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. चिरंजीव अर्णवने सादर केलेल्या स्फूर्तिगीताने संपूर्ण सभागृहात देशभक्तीचा संचार झाला.

गौरव सोहळा:

यावेळी शहीद परिवार, ज्येष्ठ सैनिक आणि युद्धवीरांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

सुभेदार रामजी बाबा सपकाळ जीवन गौरव पुरस्कार सुभेदार मेजर जयसिंग सोरटे व सुभेदार के.एम. हेलोडे यांना प्रदान.

समाज गौरव सन्मान- आशिष बाबा खरात यांना.

निःस्वार्थ पत्रकारिता गौरव-

ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेब जाधव (संपर्क प्रमुख, रिपाइं बुलडाणा), पत्रकार रविंद्र वाघ यांना.

विशेष कार्य गौरव- मनजीत भाई आणि आयु. विजय वानखडे यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

नांदेड, सांगली, संभाजीनगर, पुणे, मुंबई, नगर, नाशिक, कोल्हापूर, अकोला, अमरावती अशा राज्यभरातून आलेल्या सैनिकांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती.

आयोजन समिती:

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयु. अशोक वाघ (अध्यक्ष) आणि आयु. अनिल डोंगरदिवे (मार्गदर्शक) यांच्या नेतृत्वाखाली सिद्धार्थ खरात, कॅप्टन शालिकराम जाधव, गुलाब मिसाळ, विजय राऊत, विशाल घेवंदे, ईश्वर खरात, सुनील जाधव, विलास जाधव, अर्जुन हिवाळे, शंकर हिवाळे, विकास जाधव, मधुकर खरे, प्रकाश वाघ यांनी अथक परिश्रम घेतले.

# कोरडा दुष्काळ जाहीर केला, पण हेक्टरी मदत किती? सरकारच्या घोषणेकडे बळीराजाचे डोळे

महाराष्ट्र जीत

**सारकिन्ही,** बार्शीटाकळी तालुक्यातील सारकिन्ही परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, तूर, कपाशी इतर पिके ही पिके वाळून गेली आहेत. शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे, मात्र हेक्टरी किती हजार रुपये मदत मिळणार हे अजूनही जाहीर केले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमात आहे.

शेतकऱ्यांनी शेतीला एकरी 10 ते



15 हजार खर्च केला आहे. पंचनाम्याचे आदेश आहेत पण मदतीचा आकडा जाहीर नसल्याने शेतकरी वर्ग संभ्रमात आहेत

शासनाने तात्काळ हेक्टरी 50ते 60 हजार मदत जाहीर करून दिवाळीपूर्वी खात्यात जमा करावी, अशी मागणी सारकिन्ही परिसरातील शेतकरी वर्गाकडुन होत आहे.

**शेतकऱ्यांची प्रतिक्रिया:**

"दुष्काळ जाहीर झाला म्हणजे काय? हेक्टरी किती मिळणार हेच सरकार सांगत नाही. फक्त जाहीर करून मोकळे झाले. आम्हाला कर्ज कसे फेडायचे?"- सारकिन्ही येथील शेतकरी, कैलास चव्हाण पुजारी

# प्रभागातील समस्या ऐरणीवर त्वरित दुरुस्तीची मागणी: – नगरसेविका सौ सोनाली ताई सोनवणे

महाराष्ट्र जीत

**भगूर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

प्रभाग क्रमांक १० मधील नाल्यावरील जाळी काल तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्त करण्यात आली होती. मात्र, रात्री पुन्हा जाळी तुटली असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तरी मा. मुख्याधिकारी साहेबांनी तातडीने दखल घेऊन नगरपालिका अभियंत्यांच्या माध्यमातून या ठिकाणी



मजबूत व चांगल्या प्रतीची जाळी बसवून द्यावी, जेणेकरून कोणताही अपघात होणार नाही व नागरिकांची गैरसोय टळेल, ही कळकळीची विनंती.

मा. नगरपालिका अभियंता साहेब,कृपया या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. अशी मागणीसौ. सोनाली विक्रम सोनवणेनगरसेविका, प्रभाग क्रमांक १०, भगूर नगरपरिषद यांनी केली आहे

# दुर्गम आदिवासी भागात दीपक फाउंडेशनची फिरती आरोग्यसेवा

## माजी सभापती प्रदीप वाघ यांनी घेतला MHU सेवेचा आढावा

महाराष्ट्र जीत

**अमोल टोपले** मोखाडा: सेवा संकल्प अभियानांतर्गत खोडाळा येथे आयोजित आरोग्य शिबिरात दीपक फाउंडेशनच्या मोबाईल हेल्थ युनिट (MHU) अर्थात फिरत्या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली. आदिवासी विकास हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा माजी सभापती प्रदीप माधव वाघ यांनी शिबिराला भेट देऊन फिरत्या रुग्णवाहिकेच्या कार्याची पाहणी केली.दीपक फाउंडेशनचा MHU प्रकल्प दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत आहे. या प्रकल्पाच्या समन्वयक म्हणून डॉ. प्रिती सुनील राजभर कार्यरत असून, त्यांच्या टीममध्ये डॉक्टर, समुपदेशक, नर्स, औषध वितरणासाठी नियुक्त नर्स तसेच सुरक्षित मातृत्व कार्यक्रमातील नर्स यांचा समावेश आहे. ही टीम दर महिन्याला २४ गावांना दोन वेळा भेट देऊन आरोग्य सेवा पुरवते.फिरत्या रुग्णवाहिकेद्वारे ४० वर्षांवरील नागरिकांची



रक्तदाब व रक्तातील साखरेची तपासणी केली जाते. आवश्यकतेनुसार रुग्णांना जवळच्या शासकीय रुग्णालयात रेफर करून पुढील उपचारासाठी पाठपुरावा केला जातो. तसेच १० ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करून ॲनिमियाचे निदान, समुपदेशन व मार्गदर्शन केले जाते.गर्भवती महिला तसेच प्रसूतीनंतरच्या मातांची आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि गरजेनुसार रेफरल सेवा दिली जाते. याशिवाय सर्वसाधारण आरोग्य तपासणी, मोफत औषध वितरण, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि जनजागृतीचे कार्यही या माध्यमातून केले जाते.फिरत्या रुग्णवाहिकेच्या कार्याची माहिती घेतल्यानंतर प्रदीप वाघ यांनी दीपक फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले दुर्गम आदिवासी भागातील गोरगरीब नागरिकांना त्यांच्या दारापर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे कौतुकास्पद कार्य असल्याचे त्यांनी सांगितले.नागरिकांनीही वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी फाउंडेशनचे कार्यकर्ते गणेश झोले यांनी MHUच्या विविध सेवा व कार्यपद्धतीबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच रुग्णवाहिकेला भेट देऊन पाहणी केल्याबद्दल प्रदीप वाघ यांचे आभार मानले.खोडाळा परिसरातील अनेक नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला असून, मोफत आरोग्य सेवा गावाच्या परिसरात उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# स्वच्छता पंधरवाडा २०२६ अंतर्गत शैक्षणिक भेट







महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत: प्रशांत ठाणे :** पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता पंधरवाडा दरम्यान आज दि. ०१/१०/२०२६ रोजी जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा यवतमाळ जि. यवतमाळ येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीमध्ये वसंतराव नाईक कृषी महाविद्यालय, यवतमाळ येथील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या वेळी विद्यार्थिनींना खालील बाबींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली १. पाणी गुणवत्तेचे महत्त्व व जलजन्य आजार २. पाण्याचे भौतिक, रासायनिक व अनुजैविक तपासणीचे प्रकार ३. फिल्ड टेस्ट किट (FTK) चा वापर व प्रात्यक्षिक ४. प्रयोगशाळेतील स्वच्छता व जैव-सुरक्षितता या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये पाणी गुणवत्ता व स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण झाली.

# रिसोड तालुक्यात दुष्काळ; पेनगंगा नदीवरील बंधारे ठरताहेत 'शोभेचे बाहुले', तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी/** रिसोड तालुक्यामध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केला असला, तरी अद्यापपर्यंत शेतकरी लाभार्थ्यांपर्यंत कोणतीही ठोस मदत पोहोचलेली नाही. त्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी आता मदत नेमकी कधी मिळणार, या प्रतीक्षेत आहे. केवळ दुष्काळ जाहीर करून प्रश्न सुटणार नसून, भविष्यातील पाणीसंकट निवारण्यासाठी शासनाने आतापासूनच तातडीने आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे.

**पेनगंगा नदीचे पाणी अडवण्याची गरज**

रिसोड तालुक्यातून वाहणारी पेनगंगा नदी हा परिसरासाठी मुख्य पाण्याचा स्त्रोत आहे. मात्र, योग्य नियोजनाअभावी या नदीचे पाणी वाहून जाते. जर या नदीचे पाणी योग्य ठिकाणी अडवले गेले असते, तर आज नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा उपलब्ध राहिला असता. नदीचे पाणी अडवले तरच जमिनीतील पाण्याची पातळी वाढून आजूबाजूच्या विहिरी आणि कूपनलिकांना पाणी येईल व परिसरातील पाण्याची टंचाई दूर होऊ शकेल.

**बंधाऱ्यांची दुरवस्था आणि गेट गायब**

सध्या पेनगंगा नदीवर ज्या ठिकाणी बंधारे आहेत, ते अत्यंत दुरवस्थेत आहेत. अनेक बंधाऱ्यांची दुरूस्ती झाली नाही ही सर्वात गंभीर बाब म्हणजे, अनेक बंधाऱ्यांमध्ये पाणी अडवण्यासाठी आवश्यक असलेले लोखंडी गेट (दरवाजे) खराब झाले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पडलेले पाणी वाहून जाते आणि उन्हाळा सुरू होताच नदीपात्र कोरडे पडते.

**नवीन बंधारे आणि दुरुस्तीची मागणी**

भविष्यातील भीषण पाणीटंचाई टाळण्यासाठी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत:

नवीन बंधाऱ्यांची निर्मिती: नदीपात्रात ज्या ज्या ठिकाणी पाणी अडवणे शक्य आहे, अशा नवीन जागा शोधून तिथे तातडीने नवीन बंधारे मंजूर करून ते तयार करण्यात यावेत.

जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती: सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व जुन्या बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.

**नवीन गेट बसवणे: ज्या बंधाऱ्यांचे गेट खराब झाले आहेत, तिथे नवीन मजबूत गेट बसवण्यात यावेत.**

जर प्रशासनाने आताच या बंधाऱ्यांची दुरुस्ती केली आणि नवीन बंधारे उभारले, तर आगामी काळात जेव्हा कधी पाऊस पडेल, तेव्हा ते पाणी नदीपात्रात अडवून ठेवता येईल.

शासनाने केवळ कागदावर दुष्काळ जाहीर न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करावे आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवावी, अशी तीव्र मागणी रिसोड तालुक्यातील जनतेतून व्यक्त होत आहे.

# कोळी बोडखा शाळेत गांधी विचारांचा जागर; राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी



महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत/ प्रदीप पोटफोडे**

कोळी बोडखा: जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या जीवनकार्याला उजाळा देत त्यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य हाशेम शेख यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

यावेळी मराठी माध्यमाचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रदीप पोटफोडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सत्य, अहिंसा, स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक एकोपा या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास शाळेतील शिक्षक राजेंद्र पुरी, दादासाहेब ढोळे, तुकाराम ढोळे, शिक्षिका गंगथडे, सविता जगताप, तसेच उर्दू माध्यमाच्या शिक्षिका सुमय्या व तनवीर यांच्यासह शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शांचा आपल्या जीवनात अवलंब करण्याचा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.